दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७६ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, २२ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## राज ठाकरेंचा मनसे पक्ष एकनाथ शिंदेंच्या निवडणूक चिन्हावर लढणार..?



■मुंबई, विशाल कारंडे: आगामी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सध्या राज्यात वेगवान राजकीय घडामोडी घडत आहेत. राज ठाकरेंचा मनसे पक्ष महायुतीत सहभागी होणार की नाही याबाबत वेगवेगळे अंदाज लावले जात आहेत. दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह बैठक पार पडल्यानंतर राज ठाकरेंनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर आता राज ठाकरे महायुतीत सहभागी होणार असल्याचं नक्की झाल्याने लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेंचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष एकनाथ शिंदेंच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. म्हणजे राज ठाकरेंच्या मनसे पक्षाचा उमेदवार धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढू शकतो. मुंबईत राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात बैठक सुरु आहे. ताज हॉटेलमध्ये पार पडलेल्या या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. मागील दीड तासांपासून ही बैठक सुरु आहे. मुंबईत सध्या वेगवान घडामोडी घडत आहेत. मनसे आणि महायुतीमध्ये रोज बैठका होत आहे. नुकतंच राज ठाकरे मंगळवारी दिल्ली दौऱ्यावर गेले होते. यावेळी त्यांनी विनोद तावडे तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. यावेळी राज ठाकरे यांच्यासह त्यांचे चिरंजीव अमित ठाकरेही उपस्थित होते. यादरम्यान काय चर्चा झाली याचा खुलासा दोन्ही पक्षांनी केला नव्हता. एक ते दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल असं सांगण्यात आलं होतं. त्यानंतर आता मुंबईत राज ठाकरेंची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह बैठक सुरु आहे.

दरम्यान राज ठाकरेंसह झालेल्या बैठकीत नेमकं काय झालं याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. राज ठाकरेंशी चर्चा सुरु आहे. योग्य वेळी निर्णय घेतला जाईल, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. तसंच पुढे ते म्हणाले आहेत की, अनेक समविचारी पक्ष नरेंद्र मोदींचे विचार, सरकारचं काम यावर विश्वास ठेवून सोबत येत आहेत.

दिल्लीत राज ठाकरे आणि अमित शाह यांच्यात बैठक झाली. अमित ठाकरेही सोबत होते. महायुतीत सहभागी होण्यासंबंधी दोघांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. आणखी एका बैठकीनंतर यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. सध्या सकारात्मक चर्चा झाली इतकंच सांगू शकतो, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली होती.

लोकसभा निवडणूक असल्याने त्यासंदर्भातच चर्चा झाली. आम्ही कोणताही फॉर्म्यूर्ला दिलेला नाही, पण नेमक्या किती जागा मिळाव्यात ही भावना सांगितली आहे. भाजपाला सांगण्यता आलं असून एक-दोन दिवसात माहिती आल्यानंतर सविस्तर सांगू,₹ असं बाळा नांदगावकर यांनी सांगितलं होतं.

सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीमध्ये मनसेला दोन लोकसभेच्या जागा मिळण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबई आणि शिर्डी या दोन लोकसभेच्या जागा मनसेला दिल्या जाऊ शकतात. विशेष म्हणजे या निवडणुकीतून अमित ठाकरे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबईतून तरुण आणि सुशिक्षित चेहरा असावा यासाठी अमित ठाकरे यांनी निवडणूक लढवावी असा भाजपचा आग्रह आहे. तसं झाल्यास अमित ठाकरे निवडणूक लढताना दिसतील. दरम्यान शिर्डीमधून मनसेचे नेते बाळा नांदगावकर उमेदवार असू शकतील. पण दुसरीकडे भाजपा मनसेला एकच जागा देणार असल्याचीही सूत्रांची माहिती आहे.

## गिरणी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी शासनाकडून तीन प्रस्तावांना मान्यता, सर्वांना घरे देण्याचा प्रयत्न



■मुंबई, यश सावंत: गिरणी कामगारांच्या गृहनिमार्णासाठी राज्य शासनाने तीन प्रस्ताव तयार केले असून या प्रस्तावांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यामुळे गिरणी कामगारांसाठी अधिकाधिक घरे निर्माण होण्याची शक्यता असल्याचे गृहनिर्माण विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. गिरणी कामगारांच्या गृहनिमार्णासाठी गृहनिर्माण विभागाकडून तीन हजार कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. ठाणे, कल्याण येथे गृहनिर्माण प्रकल्प, पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून भूखंड मालकाशी संयुक्त भागीदारी आणि खासगी विकासकाच्या मंजूर अभिन्यासात पंतप्रधान आवास योजनेद्वारे गृहनिर्माण अशा तीन प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. हे प्रकल्प मार्गी लागावेत यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्तिप्रदत्त समिती आणि या प्रकल्पात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यापैकी पहिल्या प्रस्तावात म्हाडाला एक हजार कोटी तर अन्य दोन प्रस्तावात महाहौसिंगला दोन हजार कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. खासही विकासक वा भूखंडधारकांना प्रकल्प सुरु करण्यासाठी दहा टक्के अनामत रक्कम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. गिरणी कामगारांच्या गृहनिमार्णासाठी म्हाडाने ठाण्यातील उत्तरशीव (२७ एकर), कल्याण येथील रायते (अडीच एकर), गौरीपाडा (दोन एकर) आणि हेदुटणे (२३ एकर) असा सुमारे ५४ एकर भूखंड निश्चित केला होता. परंतु प्रत्यक्षात मंत्रिमंडळाने या ५४ एकर भूखंडापैकी २९ एकर भूखंडावर गिरणी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. याशिवाय कुर्ला येथील स्वदेशी मिलमधील १२२ घरे, सेंच्युरी मिलमधील म्हाडाच्या वाट्याला येणारा भूखंड तसेच काळा चौकी येथील २२ हजार चौरस मीटरवर गिरणी कामगारांसाठी तीन ते चार हजार घरे, इंडिया बुल्स कंपनीने एमएमआरडीएला दिलेली घरे तसेच पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत उपलब्ध असलेली एक लाख ३१ हजार ४३७ घरे गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न केले जाणार आहेत.

## नकली पोलीस बनून अंगाडियाची गाडी अडवून ५ कोटींची लूट




■वसई, सचिन कदम: नकली पोलीस बनून आलेल्या पाच जणांनी महामार्गावरून जार्णाया अंगाडियांना अडवून त्यांच्याकडील साडेपाच कोटींची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अंगाडियाच्या चालकासह तीन जणांना ताब्यात घेतले आहे. मुंबईच्या काळबादेवी येथे राहणारे श्रावण ठाकूर (२४) हे अंगाडिया चालक बाबू स्वामी आणि अक्षय ठाकूर हे चारचाकी गाडीने गुजरातला निघाले होते. रात्री ९ च्या सुमारास डोळ्यावर झोप येत असल्याने त्यांनी विरारच्या खानिवडे टोल नाक्याजवळ येऊन गाडी तोंड धुवण्यासाठी थांबवली होती. याच दरम्यान, त्यांच्या मागून आलेल्या एका वाहनातून ५ जण उतरले. त्यांनी आपली ओळख पोलीस असल्याची करून दिली आणि त्यांच्या वाहनात असलेल्या रोकड बाबत चौकशी केली. यानंतर त्यांनी चालक बाबू स्वामी आणि अक्षय ठाकूर यांना आपल्या वाहनात बसवून नेले तर फियार्दी यांच्या कडील रोकड असलेली बॅग, मोबाईल फोन काढून घेतला. चालक आणि अक्षय ठाकूर याला काही अंतरावर सोडून दिले. या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४१९, ३४१ आणि ३४ नुसार तोतयागिरी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. अंगाडियाचा चालकासह ४ जण ताब्यात या प्रकरणी गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अंगाडियाचा चालक बाबू स्वामी याच्यासह तीन जणांना ताब्यात घेतले आहे. रोकड घेऊन जाणार असल्याची माहिती दिल्याचा त्याच्यावर संशय आहे. योजनेनुसार चालकाने गाडी थांबवली आणि तोतया पोलिसांनी येऊन रोकड लुटून नेली असावी असे पोलिसांनी सांगितले.

## लोणीकंद पोलीस ठाणे हद्दीत तब्बल १६५ परवानाधारक शस्त्र ; आचारसंहितेमुळे शस्त्र जमा करण्याची सूचना




■पुणे, प्रतिनिधी : लोणीकंद पोलीस ठाणे हद्दीत तब्बल १६५ जणांनी परवानाधारक शस्त्र (पिस्तोल) घेतले आहे. हे घेणाऱ्या मध्ये माहिती अधिकारी कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, व्यावसायिक यांचा समावेश आहे. सध्या निवडणूक आचारसंहिता असल्याने हे शस्त्र पोलीस ठाण्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परवानाधारक शस्त्र घेण्यासाठी विहित नमुन्यात प्रशासनाकडे अर्ज करावा लागतो. अर्जदाराने या अजार्तील सर्व पूर्तता पूर्ण केल्यानंतर सर्व पडताळणी होते. शस्त्र कोणत्या कारणासाठी हवे हे स्पष्ट करावे लागते. या नंतर अर्जदाराला शस्त्राचा परवाना दिला जातो. हे खर्चिक काम आहे. स्वसंरक्षणासाठी हे शस्त्र घेतले जाते. वाघोली व परिसरात खाण व कशर, मोठे हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, गोदाम, कंपन्या, रियलइस्टेट, बांधकाम आदी व्यावसाय मोठ्या प्रमाणावर आहे. यामुळे व्यावसायिक धारकांची संख्या मोठी आहे.हे व्यावसायिक परवानाधारक शस्त्र बाळगतात. बहुतांश जण कमरेला शस्त्र लावतात. तर अनेक जण सोबत कार मध्ये ठेवतात. त्यासोबत असलेल्या काडतुसांचा हिशोब त्यांना पोलीसांना द्यावा लागतो. सध्या लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या काळत शस्त्र पोलीस ठाण्यात जमा करावे लागते. लोणीकंद पोलीस ठाणे अंतर्गत परवानाधारक शस्त्र बाळगणाऱ्याना जमा करण्याची सूचना पोलीसांनी केली आहे. आता पर्यंत केवळ पाच जणांनी शस्त्र जमा केले आहे. वेळेत शस्त्र जमा न केल्यास पोलीस कारवाई करू शकतात. असे लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास करे यांनी सांगितले. अनेक जणांना खऱ्या अथार्ने स्वसंरक्षणासाठी शस्त्राची गरज भासत नाही. मात्र केवळ आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी ते परवानाधारक शस्त्र बाळगत असल्याची चर्चा नागरिकांत आहे.

## धारावी पुनर्विकास मुद्दा केंद्रस्थानी, दक्षिण–मध्य मुंबई मतदारसंघासाठी सर्वच पक्ष उत्सुक



■मुंबई, भावना जैन : चेंबूर, धारावी, सायन-कोळीवाडा, वडाळा, माहिम आणि अणुशक्तीनगर अशा सहा विधानसभा मतदारसंघांना सामावून घेणाऱ्या दक्षिण-मध्य मुंबईत लोकसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत धारावीचा पुनर्विकास हाच मुद्दा केंद्रस्थानी राहणार असल्याचे मानले जाते. कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी न्याय यात्रेच्या मुंबईतील सांगतेच्या आदल्या सायंकाळी धारावीत भाषण करताना धारावी पुनर्विकासाच्या अनुषंगाने सरकारवर टीकास्त्र सोडले. किंबहुना, मणिपूर येथून यात्रा सुरू करण्याचे कारण स्पष्ट करतानाच आवर्जून धारावी येथे यात्रेची सांगता केल्याचेही राहुल गांधी म्हणाले. त्यामुळे या लोकसभा मतदारसंघात धारावीच्या पुनर्विकासाच मुद्दा गाजण्याचे संकेत आहेत. राखीव जागेसाठी या मतदारसंघातून निवडणूक होते. वास्तविक २००४ च्या लोकसभा निवडणुकीपासून धारावीच्या पुनर्विकासाचा मुद्दा चर्चेत आला आहे. मात्र, यंदा पुनर्विकासाचे काम अदानी समूहाला मिळाले असून सर्वेक्षणालाही सुरुवात झाली आहे. या मतदारसंघातील अन्य विधानसभा मतदारसंघाच्या तुलनेत धारावी विधानसभा मतदारसंघातूनएक गठ्ठा व विक्रमी मतदान होते. त्यामुळेच तेथील मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी सर्वच पक्ष प्रयत्नशील झाले आहेत. धारावीत आदिद्रविड, नाडर, थेवर या तामिळनाडू येथील तर महाराष्ट्रातील चर्मकार समाज, भटक्या विमुक्त जमातीमधील लोक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक, राजस्थानी अशा विविध प्रांतातील बहुविध जातींच्या व धर्माच्या लोकांच्या वस्तीचे प्राबल्य आहे. त्यामुळेच सर्वच राजकीय पक्षांनी धारावीतील विविध संस्था, कंपन्या, कुटीर उद्योग संघटना आदींशी संबंधित लोकांशी चर्चा सुरू केली आहे. राखीव मतदारसंघ असल्यामुळे येथून वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनाही येथून निवडणूक लढण्यात स्वारस्य असल्याची माहिती आहे.

## अटल सेतूच्या पुढील टप्प्याचं बांधकाम सुरु; पुणे-मुंबई प्रवासात अशी होईल वेळेची आणखी बचत



■मुंबई, दिगंबर जाधव : मुंबई ते पुणे हे अंतर मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे अर्थात द्रुतगती मागार्मुळं मोठ्या फरकानं कमी झालं आहे. देशातील सर्वात मोठा सागरी सेतू अशी ओळख असणाऱ्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक अटल सेतू मुळं मुख्य मुंबई शहर आणि नवी मुंबईतील प्रवासाची वेळ कमी झाली आणि परिणामी शहरातून पुढं प्रवास करु पाहणाऱ्या, पुण्याच्या दिशेनं जाणाऱ्यांनाही याचा थेट फायदा होताना दिसत आहे. किंबहुना येत्या काळात पुण्यापर्यंतचा प्रवास आणखी कमी वेळात शक्य होणार असून त्यादृष्टीनं अटल सेतूच्या पुढच्या टप्प्यासाठीच्या बांधकामालाही मंजुरी मिळाली आहे. २०२४ च्या सुरुवातीलाच अटल सेतूचं उद्घाटन झालं, ज्यानंतर या मागार्नं प्रवास करण्याला अनेकांनीच पसंती दिली. याच सागरी सेतूच्या चिर्ले येथील जोडणी पुलाच्या अर्थात अटल सेतूच्याच पुढील टप्प्याच्या बांधकामासाठी हिरवा कंदिल दाखवण्यात आला आहे. ज्यामुळं मुंबई- पुण्यातील अंतर आणखी कमी झालं आहे. उपलब्ध माहितीनुसार अटल सेतूच्या या जोडणी पुलाच्या बांधकामासाठी १० अब्ज रुपयांचा खर्च होण्याची प्राथमिक आकडेवारी समोर आली आहे.

दरम्यान, चिर्ले - पुणे या जोडणी पुलाचं काम ३० महिन्यांमध्ये पूर्ण होणार असल्याचं प्रस्तावित असून, यामुळं मुंबई आणि पुणे असा दैनंदिन प्रवास करणाऱ्यांसोबतच या मार्गावर लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्यांना त्यामुळं मोठा फायदा होणार आहे. इथं दक्षिण मुंबईतील शिवडी आणि वरळी उन्नत मार्गाच्या जोडणी पुलाचं काम एमएमआरडीएनं सुरु केलं आहे. या मागार्चं काम ६५ टक्के पूर्ण झालं असून, आता उर्वरित कामावर भर दिला जात आहे. सध्या या बांधकामाअंतर्गत येणाऱ्या भूखंडावर एल्फिन्स्टनमधील १९ इमारतींमधील रहिवाशांच्या पुनर्विकासाच्या धोरणावर अद्याप स्पष्टोक्ती झाली नसल्यामुळं हे काम अडलं आहे.

## महापालिका गृहनिर्माण संस्थेतील थकबाकीदारांचे नळजोड खंडित करणार



■पुणे, अभिजित येरुल्लू : कर वसुलीसाठी अवघे दहा दिवस शिल्लक राहिल्याने कर संकलन व कर आकारणी विभागाने गृहनिर्माण संस्थेतील थकबाकीदारांचे अंतर्गत नळजोड खंडित करण्याचा इशारा दिला आहे. थकबाकीदारांनी थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाला एक हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ८६० कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. मात्र, एक हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. महापालिका मालमत्ता कर वसुलीसाठी नळजोड खंडित करू शकते की नाही? या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. थकबाकी वसूल करण्यासाठी कायद्याने जे काही नियम आहेत, ते वापरण्यापासून आम्ही प्रतिबंध घालणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले असून १५ फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालयाचा निर्णय महापालिकेला मिळाल्याचा दावा सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केला आहे. या निर्णयाचा आधारे नळजोड खंडित करण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे. थकबाकीदार गृहनिर्माण संस्थांना मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत आणि थकबाकीदारांची यादी संबंधित संस्थेच्या समाजमाध्यमातील ग्रुपवर पाठविली जाईल. तसेच नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यासाठी महापालिकेमार्फत सांगण्यात येणार आहे. संस्थेमधील थकबाकीदाराचे अंतर्गत नळजोड खंडित करण्यासाठी तीन दिवसांची लेखी मुदत दिली जाणार आहे. त्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी थकबाकीदारांच्या ही बाब निदर्शनास आणून द्यावी. त्यानंतरही नळजोड खंडित न केल्यास महापालिकेच्या पथकामार्फत नळजोड खंडित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे थकित कराचा भरणा करुन गैरसोय टाळावी, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

## शिळफाटा रस्त्यालगतची भंगाराची ४० दुकाने आगीत खाक, जीवितहानी नाही



■डोंबिवली, नितीन देवळेकर : डोंबिवली जवळील शिळफाटा रस्त्यालगत गोळवली गाव हद्दीत गुरुवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत या भागातील ४० भंगाराची दुकाने जळून खाक झाली. विविध प्रकारच्या ज्वलनशील वस्तू या दुकानांमध्ये असल्याने आगीच्या भडक्याबरोबर कानठळ्या बसणाऱ्या वस्तूंचे स्फोट सुरू होते. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. दहा वषार्पूर्वी एका भंगार टॅकरची तोडफोड करताना या भागात भीषण स्फोट झाला होता. मुंबईतील कुर्ला भागातून हटविण्यात आलेले बहुतांशी भंगार विक्रेते शिळफाटा-पनवेल रस्त्यावरील दहिसर-मोरी, २७ गाव हद्दीतील गोळवली भागातील खासगी, सरकारी जमिनीवर येऊन ठाण मांडून बसले आहेत. या भंगार विक्रेत्यांकडून पालिका, स्थानिक संस्थांना कोणत्याही प्रकारे कर मिळत नाही. या भंगार गोदामांमधून लाखो रुपयांची उलाढाल होते. याच भागात जिल्ह्यातील चिंधी बाजार आहे. स्थानिकांच्या आशीवार्दाने हे बेकायदा व्यवहार सुरू आहेत. गोळवली भागात भंगार दुकानांची बाजारपेठ आहे. याठिकाणी जिल्ह्यातून खरेदी केलेले जुने, खराब झालेले प्लास्टिक, विद्युत उपकरणांची टाकाऊ भाग, गंजलेले रासायनिक टँकर, जुने लोखंड याठिकाणी खरेदी केले जाते. या भंगार वस्तूमधून काही विक्रेते टिकाऊ वस्तू तयार करून त्याची विक्री करतात. शंभरहून अधिक भंगार विक्रीची दुकाने गोळवली परिसरात आहेत. गुरुवारी मध्यरात्री अचानक एका भंगार गोदामाला आग लागली. दुकानांमधील प्लास्टिक, ज्वलनशील वस्तूंनी पेट घेतल्याने आणि दुकाने पत्रा निवारा, हिरव्या जाळ्यांनी उभारलेली आहेत. त्यामुळे ही दुकाने भराभर पेटत गेली. आग लागताच ज्वलनशील वस्तूंचे स्फोट होऊ लागले.

बहुतांशी भंगार विक्रेते कल्याण, डोंबिवली, मुंबई परिसरात राहतात. आग लागल्याचे समजताच ज्या दुकानांमध्ये कामगार झोपले होते. त्यांनी दुकानाबाहेर पळ काढला. गोळवली परिसरात ही आग पसरू नये म्हणून स्थानिकांनी टँकरव्दारे आगीवर पाणी मारले. तोपर्यंत अग्निशमन विभागाची कल्याण, उल्हासनगर, एमआयडीसीतून १२ वाहने घटनास्थळी दाखल झाली.

## आचारसंहितेमुळे मोफत वस्तू वाटपास प्रतिबंध; 'आनंदाचा शिधा' दोन महिने बंद




■ठाणे, रोहित जैसवाल : राज्य सरकारने दुर्बल घटक, सामान्य नागरिकांना शिधावाटप दुकानाच्या माध्यमातून सण, उत्सवाच्या काळात लागणारे अत्यावश्यक साहित्य किरकोळ दराने वाटप करण्याचे धोरण अवलंबिले होते. मात्र, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने आनंदाचा शिधा दोन महिने बंद राहणार आहे. मोफत पिशव्या, साड्या, शिधा वाटप करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. दीड वर्षाच्या कालावधीत राज्य सरकारने १०० रुपये दर आकारून एक किलो साखर, अर्धा किलो रवा, मैदा, एक किलो तेल, चणाडाळ या वस्तूंचा संच तयार करून तो शिधावाटप दुकानातून लाभार्थींना सणाच्या काळात वाटप केला जात होता. आता होळी, गुढीपाडवा उंबरठ्यावर येऊन ठेपले आहेत. आता आदर्श आचारसंहिता लागू असल्याने निवडणूक आयोगाच्या आदेशावरून लाभार्थींना शिधावाटप दुकानातून देण्यात येणारे वस्तूंचे संच आचारसंहिता संपेपर्यंत (७ जून) वाटप न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. होळी, गुढीपाडव्याला आनंदाचा शिधा वाटप करण्याचे राज्य सरकारचे नियोजन होते. परंतु त्याला आता आचारसंहितेचा अडसर आला आहे. सण, उत्सवात आनंदाचा शिधा वाटप करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे घेतला जाईल. कुठेही आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे.

## १२४ वर्षे जुन्या बंगल्याचे पाडकाम, मंगळवारपासून कारवाईला सुरुवात



■मुंबई, विशाल पाटील : अंधेरीतील प्रसिद्ध सात बंगला परिसरातील १२४ वर्ष जुना रतन कुंज बंगला जमीनदोस्त होणार आहे. १२४ वर्षांपूर्वी सात श्रीमंत कुटुंबांनी बांधलेल्या बंगल्यांमुळे हा परिसर सात बंगला नावाने ओळखला जातो. या सात बंगल्यांपैकी आता केवळ दोनच बंगले शिल्लक आहेत. त्यातही समुद्रकिनाऱ्यावर वसलेला रतन कुंज हा बंगला धोकादायक स्थितीत आहे, यावर महापालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीकडून शिक्कामोर्तब झाल्यानंतर मंगळवारपासून या बंगल्याचे पाडकाम सुरू करण्यात आले असल्याची माहिती के पश्चिम विभागाच्या पालिका अधिकाऱ्यांनी दिली. महापालिकेने हा १२४ वर्ष जुना बंगला धोकादायक स्थितीत असून तो लवकरात लवकर खाली करण्याची नोटीस मालक बरार कुटुंबीयांना दिली होती. मात्र या बंगल्याची मालकी दोन भावांकडे असून त्यांच्यापैकी एका कुटुंबाने बंगला त्वरीत खाली करण्याची तयारी दाखवली होती. तर शालू बरार आणि त्यांच्या दोन मुलांकडे या बंगल्याचे अर्धे मालकी हक्क असल्याने त्यांनी मात्र बंगला सोडण्यास नकार दिला होता. ही जागा लाटण्याचा डाव असल्याचा संशय शालू बरार यांनी व्यक्त केला होता. त्यांनी पालिकेच्या नोटीशी विरोधात न्यायालयात धाव घेतली होती.

या बंगल्यावरून दोन भावांमध्ये वाद आहेत. दोन्ही कुटुंबांनी बंगल्याचे वेगवेगळे संरचनात्मक लेखापरीक्षण करून त्याचे स्वतंत्र अहवाल पालिकेकडे दिले होते. हे दोन्ही अहवाल तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठवण्यात आले होते, त्यावर समितीने संबंधित बंगला राहण्यायोग्य स्थितीत नसल्याचा निर्णय दिला. संबंधित कुटुंबियांनी बंगला खाली करत असल्याचे निवेदन न्यायालयात दिले आहे. त्यामुळे नियमानुसार बंगला जमीनदोस्त करण्याच्या कारवाईला मंगळवारपासून सुरुवात करण्यात आली असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

//सुविचार
लोकं आपल्याला कॉपी करायला लागले की समजावं तुम्ही यशस्वी झालात. //



# दातांच्या समस्येनेदेखील कर्करोग होण्याची शक्यता

**कर्करोग** (कॅन्सर) होण्याचे नवे कारण सध्या समोर आले आहे. देशातील कित्येक लोकांना दात स्वच्छ न केल्यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर) झाल्याचे समोर आले आहे. अशी दिरंगाई करणाऱ्या लोकांच्या संख्येत ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे लोक कोणत्याही प्रकारच्या तंबाखूचे सेवन करत नाहीत, त्यांना सुद्धा कर्करोग (कॅन्सर) होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या दातांच्या फटी योग्यरीत्या साफ न केल्यामुळे हा गंभीर त्रास उद्‌भवण्याची शक्यता आहे. अन्नाचे कण दातांमध्ये अडकतात आणि त्यानंतर ते कण कुजतात. कुजलेल्या कणांमुळे सुद्धा कर्करोग होऊ शकतो. मगील सहा वर्षांमध्ये भारत देशात ओठ आणि तोंडाचे कर्करोग असणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या परिस्थितीला रोखण्यासाठी खराब दातांची स्वच्छता, तुटलेले दात याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

### काही उपाय

- तंबाखू खाणे टाळा. जर तंबाखू खात असाल तर वेळीच खाणे बंद करा.
- मद्याचे सेवन प्रमाणात करा.
- उन्हामध्ये फार काळ राहणे टाळा. उन्हात जाण्याआधी लिपबामचा वापर करा.
- फास्ट फूड खाणे टाळा किंवा प्रमाणात खा. आहारात ताज्या फळांचा वापर करा.
- सतत तंबाखूची तलफ येत असल्यास पायऱ्यांवरून चढ- उतार करा.







# सन टॅनिंग दूर करण्यासाठी घरगुती फेस पॅक

### साखर आणि लिंबू

एक चमचा साखर, अर्धा चमचा ग्लिसरिन, १ चमचा लिंबाचा रस मिसळून घ्या. स्क्रबप्रमाणे त्वचेवर मसाज करत लावा. तीन मिनिटे स्क्रब करत राहा. नंतर पाण्याने धुऊन टाका. याने मृत त्वचा आणि टॅनिंग दोन्हींपासून सुटका

### हळद-बेसन

दोन चमचे बेसन, चिमूटभर हळद, १ चमचा गुलाबपाणी, १ चमचा दूध एका बाऊलमध्ये मिसळून घ्या. हा पॅक चेहरा, गळा आणि इतर प्रभावित भागांवर लावा आणि २० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर स्क्रब करत हटवा. आठवड्यातून दोनदा वापरा.

### लिंबाचा रस आणि गुलाबपाणी

एक चमचा लिंबाचा रस, १ चमचा काकडीचा रस आणि १ चमचा गुलाबपाणी मिसळा. टॅनिंग होत असलेल्या जागेवर लावून २० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर हलक्या पाण्याने मसाज करत स्वच्छ करा. दररोज हा पॅक वापरता येईल. याने टॅनिंग दूर होईल आणि हा सनस्क्रीनचा पर्याय म्हणून देखील

### अ‍ॅलोव्हेरा आणि टोमॅटो पॅक

एक चमचा मसूर डाळ पावडर, १ चमचा टोमॅटो रस आणि १ चमचा अ‍ॅलोव्हेरा रस मिसळून पेस्ट तयार करावी. अर्धा तास प्रभावित भागेवर लावून ठेवावी. नंतर स्क्रब करत ताज्या पाण्याने त्वचा स्वच्छ करावी. आठवड्यातून दोनदा हे वापरू शकता. लिंबाच्या सालांची पावडर एक चमचा दुधात मिसळून



पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहऱ्यावर १०-१५ मिनिटे लावा. नंतर गार पाण्याने धुऊन टाका. हा पॅक आठवड्यातून २-३ वेळा वापरता येईल.

# उन्हाळ्यात जांभूळ खाताय जाणून घ्या घरगुती उपयोग

**उन्हाळ्याचे** दिवस म्हटलं की जांभूळ हे फळ आपल्याला बाजारात सर्वत्र दिसते. या लहान आकाराच्या फळाची ओढ प्रत्येकाला असते. आकाराने लहान असले तरी जांभूळ फळाचे अनेक फायदे आहेत. मूळ दक्षिण आशिया आणि आग्नेय आशियात आढणाऱ्या जांभूळ फळाचे शास्त्रीय नाव 'सायझिजियम क्युमिनी' असे आहे. जांभळ्या रंगाच्या या फळाची चव गोड-तुरट असते. हा पुरातन उपयुक्त वृक्ष आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातूनही फार महत्त्वाचा आहे.

जांभळाच्या सुकलेल्या बियांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, जांभळामध्ये रक्तातील शर्करेचे प्रमाण कमी करण्याचे तत्त्व असतात. सुगंधी पाने आणि गुणकारी बीज, फळे, फुले असलेल्या या वृक्षाचा उपयोग प्राचीन काळी सौंदर्य प्रसाधने तयार केला जात असे.

मधुमेह नियंत्रित ठेवण्याबरोबरच शरीरातून हानीकारक केमिकल्स बाहेर टाकण्यास जांभळाच्या बियांचा उपयोग होतो. म्हणून जांभूळ खाऊन बिया फेकून देण्यापूर्वी त्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.

### मधुमेहावर नियंत्रण

जांभळांमध्ये अँटी डायबेटिक गुणधर्म असतात. जांभळाच्या बिया सुकवून त्याची पावडर करा आणि दिवसातून तीनवेळा खा. मधुमेहावर हा अत्यंत चांगला उपाय आहे. दूध किंवा पाण्यासोबत ही पावडर सकाळी रिकाम्या पोटी घ्या. त्यामुळे देखील मधुमेह निर्यंत्रित राहील. हा उपाय पारंपरिक असून अतिशय परिणामकारक आहे.

### रक्तदाबाचा त्रास कमी होतो

मधुमेहासोबतच रक्तदाबाचा त्रास कमी करण्यास जांभूळ फायदेशीर आहे. जांभळाच्या बियांचा रस किंवा अर्क नियमित घेतल्यास रक्तदाब ३४.६ टक्क्यांनी कमी होतो.

### पोटांच्या विकारांवर उपयुक्त

पचन संस्था स्वच्छ करण्यासाठी आणि पोटाचे विकार दूर करण्यासाठी जांभूळ उपयुक्त ठरते. बियांचा अर्क जखम किंवा आतड्यातील अल्सर इन्फेकशन दूर करण्यास फायदेशीर आहे. जुलाब झाल्यास जांभळाच्या बियांची पावडर साखरेत मिसळून दिवसातून २-३ वेळा घ्या.



# घरातून पाल घालवण्यासाठी करा हे उपाय

**अनेकांच्या घरात पाल येण्याची मोठी समस्या असते. सध्या उन्हाळ्याच्या दिवसांत तर हे प्रमाण अधिक वाढलेलं पाहायला मिळातं. खिडक्या, दरवाजातून पाली घरांत येत असतात. पाल स्वयंपाकघरात असेल तर ती खाण्या-पिण्याच्या पदार्थांमध्ये पडण्याचाही धोका असतो. परंतु काही घरगुती उपायांनी पाल घालवण्यास मदत होऊ शकते. पाल दिसल्यास तिच्यावर बर्फाचं पाणी स्प्रे करा. ज्या ज्या वेळी पाल दिसेल त्या त्या वेळी हा उपाय करा. यामुळे पाल घरातून निघून जाते.**

### कांदा-लसूण

कांद्याचा रस आणि काही लसणाच्या पाकळ्यांचा रस एकत्र करा. त्यात थोडं पाणी मिसळावं. हे मिश्रण एका बाटलीमध्ये भरा. ज्या ठिकाणी पाल येते त्या ठिकाणी हे मिश्रण शिंपडावं. त्यामुळे पाल आपोआप निघून जाईल. लसणाच्या पाकळ्याही पाल येते त्या ठिकाणी ठेवल्यासह फायदा होतो. कांदा लांब-लांब कापून त्याला धाग्यात बांधून घरातील कोपऱ्यात लटकवल्यानेही पाल घरात येत नाही.



### काळीमिरी

काळीमिरी पावडर पाण्यात मिसळून एका बाटलीत भरा. त्यानंतर हे पाणी घरातील प्रत्येक कोपऱ्यात शिंपडा त्यामुळे पाल घरात येण्यास प्रतिबंध लागतो.

### मोरपीस

घरात ज्या ठिकाणी पाल आली आहे किंवा ज्या ठिकाणाहून पाल घरात येते त्या ठिकाणी मोरपीस लावल्यासही पाल घरांतून पळून जाते. पालीला मोरपीस म्हणजे साप किंवा कोणता तरी प्राणी वाटतो, जो तिला खाईल. या भीतीमुळे पाल त्या जागी येत नाही.

### अंड्याचं कवच

पाल येण्याच्या ठिकाणी अंड्याचं कवच ठेवल्यानेही पाल घरात येत नाही. खिडक्यांच्या कोपऱ्यात कवच ठेवल्याने पालींना आत येण्यास अटकाव होतो. अंड्याचं कवच दर चार दिवसांनी बदलत राहावे.

### कॉफी आणि तंबाखू

कॉफीमध्ये तंबाखू मिसळून त्याचे गोळे तयार करा. ज्या ठिकाणांहून पाल येते त्या ठिकाणी हे गोळे ठेवल्यानेही पाल घरात येत नाही.

# वेट लॉसमध्ये देखील इफेक्टिव्ह आहेत हे मसाले

रोजच्या जेवणात वापर करण्यात येणारे काही मसाले जेवणाची चव वाढवतात तसेच वजन कमी करण्यास देखील मदत करतात.

### दालचिनी

- रोज १ चमचा दालचिनीचे सेवन केले पाहिजे. याने वजन वाढत नाही.
- दालचिनी ब्लड शुगर कमी करून बॅड कोलेस्ट्रॉल पण कमी करते.
- याचे नियमित सेवन केल्याने वेट लॉस होण्यास मदत मिळते.
- पण याचे सेवन अधिक मात्रेत करू नये. कारण यात क्युमरीन नावाचे केमिकल असते, जे लिव्हरला नुकसान पोहोचवते.

### तिखट

- तिखटात कॅप्सेसिन नावाचे तत्त्व असते, ज्यात फॅट बर्न करण्याची क्षमता असते.
- यात असणारे तत्त्व सेंट्रल नर्व्हस सिस्टमला शरीरात गरमी आणण्यासाठी उत्तेजित करतात, ज्यामुळे जास्त आणि लवकर कॅलरी बर्न होते.
- तिखटात उपस्थित कॅप्सेसिन भूक कमी करण्याचे काम करते.



### सरसो

- सरसोत आढळणारे तत्त्व थर्मोजेनिक मेटाबॉलिझम वाढवण्यासोबत फॅट बर्न करण्यात देखील सहायक असते.
- एका शोधानुसार फक्त एक टीस्पून गरम सरसोचे सेवन केल्याने पुढील काही तासांपर्यंत मेटाबॉलिझम २० ते २५ टक्के वाढलेले असते.

### काळीमिरी

- काळीमिरी पचनशक्ती ठीक करून पोषकतत्त्वांना पचवण्यास मदत करते.
- काळीमिरीत आढळणारे मुख्य तत्त्व पीपीराइन मेटाबॉलिझम वाढवण्यास सहायक असते.
- जर तुम्हाला काळीमिरीचे सेवन व्यवस्थितपणे करायचे असेल तर रोज एक चमचा काळीमिरी पूड घ्या.

# तिरुपतीच्या दर्शनासाठी जान्हवी कपूर गुडघे टेकत चढली पायऱ्या; म्हणाली, 'देवाला भेटण्याचा हक्क...'

अभिनेत्री जान्हवी तिच्या आईच्या दाक्षिणात्य प्रथा, परंपरा यांच्यावर फार विश्वास ठेवते. तिची देवावर फार श्रद्धा आहे आणि अनेकदा तिरुपतीला दर्शन घेण्यासाठी जाताना ती दिसली आहे. २७ वर्षे पूर्ण करत ६ मार्च रोजी जान्हवीने तिचा वाढदिवस साजरा केला. विशेष म्हणजे वाढदिवसानिमित्त जान्हवी तिरुपतीला दर्शन घेण्यासाठी गेली होती आणि मंदिरात जाताना गुडघे टेकत ती पायऱ्या चढली.

जान्हवी तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारिया आणि सोशल मीडिया स्टार असलेला तिचा जवळचा मित्र ओरी यांच्यासह तिरुपतीच्या दर्शनासाठी गेली होती. याचा व्हिडीओ ओरीने त्याच्या यूट्यूब चॅनेलवर शेअर केला आहे. जान्हवी वाढदिवसाच्या आदल्या दिवशी ओरी आणि शिखरबरोबर तिरुमालाला पोहोचली. या



दिवशी तिने पिच रंगाचा कुर्ता परिधान केला होता.


जान्हवीने सांगितलं की ती तिरुपतीला किमान पन्नास वेळा आली असेल. तर शिखर नऊ वेळा. तिरुपतीला येण्याची ओरीची ही पहिलीचं वेळ होती. सुरुवातीलाच त्यांनी २१०० पायऱ्या पार केल्या. तिथल्याच एका मंदिरात जाताना जान्हवी गुडघे टेकत पायऱ्या चढली.

ओरीच्या व्हिडीओमध्ये जेव्हा त्याने जान्हवीला विचारलं की, तुला आज कसं वाटतय? यावर जान्हवी म्हणाली, देवाला भेटण्याचा हक्क कमावणं फार महत्त्वाचं आहे, म्हणून आम्ही ते कमवण्याचा प्रयत्न करत आहोत. मंदिराच्या दिशेने जात असताना शिखरही आपली भावना व्यक्त करत म्हणाला, जीवनात जर शांती मिळवायची असेल तर ती बालाजीच्या चरणी मिळेल.जान्हवीच्या वाढदिवशी तिने खास लाल आणि जांभळ्या रंगाची दाक्षिणात्य पद्धतीची साडी नेसली होती.

ओरी आणि शिखरने सफेद रंगाची लुंगी आणि शाल परिधान कली होती. दर्शन झाल्यानंतर विमानात केक कापून सगळ्यांनी जान्हवीचा वाढदिवस साजरा केला.दरम्यान, जान्हवीच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, जान्हवी येत्या काळात सनी संस्कार की तुलसी कुमारी, मिस्टर आणि मिसेस माही, देवरा यांसारख्या चित्रपटांमध्ये झळकणार आहे.

# 'मी सतत माझा हार्टरेट...', अडीच महिन्यांनी पुन्हा त्याच सेटवर परतला श्रेयस तळपदे

अभिनेता श्रेयस तळपदेला गेल्यावर्षी १५ डिसेंबरला हृदयविकाराचा झटका आला होता. यानंतर अभिनेत्यावर अंधेरीमधील वेलव्हू रुग्णालयात अँजिओप्लास्टी करण्यात आली. कायम स्वतःच्या फिटनेसकडे लक्ष देणाऱ्या श्रेयसला हृदयविकाराचा झटका आल्याने सवार्नाच धक्का बसला होता. डिसेंबर महिन्यात तो 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र होता. याच सेटवरून घरी परतल्यावर त्याला हृदयविकाराचा झटका आला. आता साधारण अडीच महिन्यांनी अभिनेता पुन्हा एकदा कामावर परतला आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्याने त्याच्या तब्येतीबद्दल खुलासा केला आहे. श्रेयस तळपदे न्यूज १८ शी संवाद साधताना याबद्दल म्हणाला, या सगळ्या आजारपणातून सावरल्यावर पुन्हा सेटवर येण्याआधी मी थोडाफार नर्व्हस होतो. पुन्हा काही गडबड तर होणार नाही ना...या सगळ्या गोष्टी माझ्या डोक्यात चालू होत्या. सेटवर परतल्यावर मी सतत माझा हार्टरेट तपासत होतो. अर्थात मी जास्त घाबरलो होतो. परंतु, डॉक्टरांनी मला कसलंही दडपण घेऊ नकोस, निश्चिंत राहा असं सांगितलं आहे. याशिवाय कोणत्याही जड वस्तू उचलू नकोस अशा सूचना सुद्धा दिल्या आहेत. श्रेयस पुढे म्हणाला, अलीकडे मी डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार काम करत आहे. माझ्या कुटुंबातील जवळच्या लोकांना मी या आजारामुळे गमावलं आहे. माझे बाबा व काकांना हृदयविकाराचा झटका आला होता. दरम्यान, अहमद खान दिग्दर्शित वेलकम टू द जंगल या चित्रपटात श्रेयस तळपदेसह अक्षय कुमार, रवीना टंडन, दिशा पटानी, जॅकलिन फर्नांडिस, अर्शद वारसी, संजय दत्त, तुषार कपूर आणि राजपाल यादव हे कलाकार झळकणार आहेत.



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | | | 7 | 8 | 4 | | |
| | 7 | | 9 | | | 5 | | 2 |
| | | 8 | | | | | | |
| 3 | | | 6 | | | 7 | 9 | |
| 7 | | 5 | | | | 2 | | |
| | | | | 4 | 5 | 3 | | 6 |
| 5 | 2 | | | 1 | | 9 | 3 | |
| | | 7 | 3 | | | | | |
| 8 | | 1 | | 2 | | | | |

## उत्तर सुडोकू -३७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 1 | 9 | 8 | 4 | 2 | 3 | 5 |
| 2 | 8 | 5 | 1 | 6 | 3 | 4 | 7 | 9 |
| 3 | 9 | 4 | 5 | 2 | 7 | 6 | 8 | 1 |
| 9 | 1 | 6 | 2 | 3 | 8 | 5 | 4 | 7 |
| 4 | 2 | 7 | 6 | 5 | 1 | 8 | 9 | 3 |
| 5 | 3 | 8 | 4 | 7 | 9 | 1 | 2 | 6 |
| 1 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 | 8 |
| 8 | 6 | 2 | 3 | 9 | 5 | 7 | 1 | 4 |
| 7 | 4 | 9 | 8 | 1 | 6 | 3 | 5 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### २२ मार्च

- १७३९: नादिरशहाने दिल्ली ताब्यात घेतली.
- १९३३: डकाऊ छळछावणीची सुरुवात झाली.
- १९४५: अरब लीगची स्थापना झाली.
- १९७०: हमीद दलवाई यांनी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.
- १९९९: लता मंगेशकर आणि भीमसेन जोशी यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर केला.
- १९८०: PETA ची स्थापना २२ मार्च जन्म
- १७९७: जर्मन सम्राट विल्हेल्म (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १८८८)
- १९२४: यूए.एस.ए. टुडे चे स्थापक अल नेउहार्थ यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१३)
- १९२४: नाटककार आणि पटकथाकार मधुसूदन कालेलकर यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९८५)
- १९३०: ख्रिश्चन प्रसारण नेटवर्क चे स्थापक पॅट रॉबर्टसन यांचा जन्म.
- १९३३: इराण चे पहिले अध्यक्ष अबोलहसन बनीसद्र यांचा जन्म.
- १८३२: जर्मन महाकवी आणि लेखक योहान वूल्फगाँग गटें यांचे निधन. (जन्म: २८ ऑगस्ट १७४९)
- १९८४: लेखक आणि पत्रकार प्रभाकर पाध्ये यांचे निधन.
- २००४: कायदेपंडित आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बॅरिस्टर व्ही. एम. तारकुंडे यांचे निधन. (जन्म: ३ जुलै १९०९)
- १८४७: कालजंत्रीकार बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर १९०६)
- १८८७: देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक मानवेंद्रनाथ रॉय यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १९५४)
- १९१६: भारतरत्न शहनाईवादक बिस्मिल्ला खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००६)

- १७३९: नादिरशहाने दिल्ली ताब्यात घेतली.
- १९३३: डकाऊ छळछावणीची सुरुवात झाली.


## भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल.महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील.वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील.वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# हिंद महासागराची सुरक्षा

हिंद महासागर क्षेत्रात चीनने भारताशी वर्चस्वसंघर्ष आरंभला आहे. त्याला शह देण्यासाठी व्यूहरचनात्मक आघाडी आपण अधिक बळकट करत आहोत, त्याला चांगले यश येताना दिसत आहे. भारताच्या दक्षिणेला हिंद महासागरात मालदीव नामक छोटासा देश सध्या भारतासाठी कटकटी उत्पन्न करीत आहे. गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये मुज्झू नांवाचा पुढारी मालदीवच्या अध्यक्षपदी निवडून आला तेव्हापासून हा महाभाग चीनच्या कच्छपी लागला आहे; तर भारताशी मात्र सर्व तऱ्हेचे तंटेबखेडे करण्यात व्यग्र झाला आहे. वस्तुतः आतापर्यंत वेगवेगळ्या निमित्तांनी भारताने मालदीवला बहुमोल सहकार्य दिलेले आहे. म्हणजे यापूर्वी भारताला बोलवा हे धोरण मालदीवला प्रिय होते. वर्तमानात भारताला मालदीवमधून घालवा हा उद्घोष मुज्झू यांनी चालविला आहे. खरे म्हणजे, अवघा हिंद महासागरच चीनच्या आहारी जाणार का? हा प्रश्न या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. चीनने आपल्या परिसरातली तैवानची सामुद्रधुनी, दक्षिण चीन समुद्र, पीत समुद्र अशा सागरांवर आमचे प्रभावक्षेत्र म्हणून कैक उचापती चालविल्या आहेतच. पण आता चीनपासून खूप दूर असलेल्या हिंद महासागरही आमच्याच वर्चस्वाखाली आहे, हे दाखवून देण्यासाठी चीन उतावीळ झाला आहे. हिंद महासागराची सुरक्षितता हा विषय भारताच्या दृष्टीने लाखमोलाचा आहे आणि म्हणूनच या विषयाचे विवेचन आता प्रासंगिक आहे. मैत्रीचे धागे, भारताने हिंद महासागरातच अन्य देशांशी मैत्रीचे धागे विणून चीनला काटशह देण्याचे योजिले आहे, या महासागरापलीकडेही जाऊन भारताने हिंद महासागर सुखरुप राहावा, या हेतूने प्रयत्न चालविले आहेत. या व्यतिरिक्त चीनच्या प्रभाव क्षेत्रातल्या संत्रस्त देशांना सहाय्य पुरवूनही भारत आपल्या उद्दिष्टाची पूर्तता करीत आहे. हिंद महासागरावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दिशेने चीन अर्थातच कैक वर्षे विविध प्रकारचे प्रयत्न करीत आहे. या महासागरात ठाण मांडून बसलेल्या सहाही देशांत चीनचे दूतावास आहेत, या देशांमधून कूटनैतिक तसेच सैनिकी संबंधांची वीण बांधण्यात चीनने यापूर्वीच मजल मारलेली आहे. श्रीलंका, मालदीव, मॉरिशस, सेशल्स, मादागास्कर आणि कामारोस हेच ते सहा देश आहेत. मालदीवला तर चीनने निःशुल्क सैनिकी सहाय्य देण्याचा घाट घातला आहे. हिंद महासागर आफ्रिकेलाही खेटून वसला आहे. म्हणून आफ्रिकेच्या वायव्येला सिएरा लिओन देशाच्या जिबुती राजधानीत चीनने लष्करी तळ उभा केला आहे. म्यानमार, बांगलादेश इथे चीन धुडगूस घालत आहे. पाकिस्तानला तर चीनने स्वतःच्या वसाहतीत परिवर्तित केलेले आहे.या पार्श्वभूमीवर भारताने मॉरिशसपासून एक हजार शंभर किलोमीटर अंतरावर आणि मालदीवपासून दोन हजार पाचशे किलोमीटरवर असलेल्या अगलेगा नामक बेटांवर विमानांसाठी धावपट्टी, तर बोटींसाठी बंदर बांधण्याचे ठरविले आहे. आनंद म्हणजे मॉरिशसच्या विद्यमान सरकारने भारताच्या या कृतीचे स्वागतच केले आहे. मालदीवच्या पूर्वेला श्रीलंका आहे. हा देश चीनने रचलेल्या कर्जाच्या सापळ्यात अडकला असल्याने त्याला भारताच्या मदतीची निकड आहे.भारताने मात्र कर्ज म्हणून नव्हे तर अनुदान म्हणून अशी मदत देऊ केलेली आहे. श्रीलंका सरकारने चीनकडून मिळणारे सहाय्य नाकारून भारतास मात्र होकार दिला आहे. याच सरकारने सागरी संशोधन करण्याच्या हेतूने चीनकडून रवाना झालेल्या जहाजांना अनुमती नाकारली होती, कारण चीनचा हेतू हेरगिरी करण्याचा प्रयत्न आहे, असा आरोपच श्रीलंकेने केला आहे.सन २०११ मध्ये स्थापन झालेल्या कोलंबो सुरक्षा मंडळात श्रीलंका, मॉरिशस व भारत असे देश सामील झाले आहेत. या मंडळाकडून हिंद महासागराच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवले जाणार आहे. हिंद महासागरातल्या भारतविरोधी कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठीच भारताने लक्षद्वीपमधील मिनिकॉय येथे लष्करी तळ बांधला आहे.चीनकडून पाकिस्तानला जहाजातून नेली जाणारी आण्विक सामुग्री भारताने मुंबईच्या न्हावा-शेवा बंदरात जप्त केली आहे. म्हणजेच हिंद महासागरातून अरबी समुद्रात आणि पुढे पाकिस्तानच्या ग्वादार बंदरापर्यंत प्रवासासाठी निघालेले जहाज आपण अडवले. चीनच्या गुप्त हालचालींना आपण आळा घालू शकतो; आमचे हेरखाते त्यादृष्टीने सक्षम आहे, हे या घटनेने सिद्ध केले आहे. मिनिकॉय लष्करी तळावर हेलिकॉप्टर्स व विमानेही आपण तैनात केली आहेत.विशाखापट्टण येथे मार्च २०२४ मध्येच झालेल्या मीलन नौदल कवायतींमध्ये पन्नास देशांनी सहभाग नोंदवला. अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेल्या व समुद्रात तीन हजार फूट खोली गाठणाऱ्या पाणबुड्या आता आपल्याजवळ आहेत. विविध देशांच्या जहाजांना दहशतवाद्यांकडून, चाच्यांकडून तसेच अंमली पदार्थांची ने-आण करणाऱ्या दुष्टशक्तींकडून धोके संभवतात.तेव्हा या धोक्यांपासून त्या-त्या देशांच्या जहाजांना वेळीच सहाय्य पुरविण्याची क्षमता आता भारताकडे आहे. म्हणूनच सन १९९५ पासून योजल्या जाणाऱ्या द्वैवार्षिक कवायतींकडे आता तर पन्नास देश आकृष्ट झाले आहेत. हिंद महासागरातून कैक देशांची जहाजे नित्य ये-जा करीत असतात. चीनचा इरादा या महासागरावर वर्चस्व मिळविण्याचा आहे. म्हणजे दक्षिण चीन समुद्रात जसा चीनने बेमुर्वत धुडगूस घातला आहे, तसाच बेकायदेशीर उद्योग भारताच्या दक्षिणेकडेदेखील आपल्याला घालता येईल, ही चीनची इच्छा व अटकळ आहे. आज उद्योग आणि व्यापार या दोन्ही क्षेत्रात चीन थेट अमेरिकेला आव्हान देत आहे. म्हणूनच चीनने अमेरिकाविरोधी रशिया, इराण, उत्तर कोरिया अशा देशांची आघाडी उघडली आहे. साहजिकच भारतानेही अमेरिका, ऑस्ट्रेलिया व जपान यांच्याबरोबर चतुष्कोनी आकृतिबंध क्वाड च्या माध्यमातून उभा केला आहे.

# डबे प्रवासी की..



**प्रवासाची** वेळ जवळ आली की रेल्वेच्या यार्डात बराच काळ उभे करून ठेवलेले डबे एकमेकांना जोडण्याचे काम सुरू केले जाते. दिल्लीश्वरांच्या हट्टापायी काय काय पात्रांस जवळ करण्याची वेळ भाजपने स्वतःवर आणली हे पाहून त्या पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाची कीव यावी. प्रवासाची वेळ जवळ आली की रेल्वेच्या यार्डात बराच काळ उभे करून ठेवलेले डबे एकमेकांना जोडण्याचे काम सुरू केले जाते. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सध्याचे राजकीय चित्र हे असे रेल्वे स्थानकाचे स्मरण करून देणारे आहे. रेल्वे स्थानक आणि हे राजकीय चित्र यातील एक साम्य आणि एक फरक तेवढा नमूद करायला हवा. साम्य असे की रेल्वेच्या यार्डात बराच काळ दुर्लक्षित राहिलेल्या डब्यांप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांस स्वतःस कोणत्या इंजिनास जोडून घ्यावयाचे हे ठरवण्याचा अधिकार नाही. यातील एका गाडीचे दोन चालक दिल्ली-स्थित असून ईडी-पिडी, केंद्रीय गुन्हा अन्वेषण यंत्रणा आदी रिमोट कंट्रोलां या साहाय्याने यातील अनेक डबे एकाच भगव्या रंगाच्या गाडीस कसे जोडले जातील; याचे अव्याहत प्रयत्न त्यांच्याकडून सुरू आहेत. ही गाडी अतिजलद मानली जाते आणि तिच्या चालकांचे सामर्थ्य लक्षात घेता तिला अखंड हिरवा कंदील मिळत राहील याचीही व्यवस्था आहे असे म्हणतात. फरकाचा मुद्दा असलेली दुसरी गाडी सामान्य ह्यपासिंजरह्ल असून तिचे चालक आपल्या गाडीस कोणता रंग द्यावा याच विचारात गर्क दिसतात. तसेच या गाडीस नक्की कोणते डबे लागले जाणार, किती लागणार आणि मुख्य म्हणजे या गाडीचे इंजिन कोणते आणि त्याची दिशा कोणती या प्रश्नांची उत्तरेही शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. शक्यता ही की पहिल्या अतिजलद गाडीने नाकारलेले अथवा सोडून दिलेले काही डबे स्वतःस या दुसऱ्या पासिंजरगाडीस जोडले जातील. असो. रेल्वे यार्डातले डबे आणि राजकीय पक्ष यांतील रूपक येथे संपते. ते गंमत म्हणून ठीक. पण त्यानंतर या पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेचा विचार पुरेशा गांभीर्याने करायला हवा. कारण यातील राजकीय पक्षांचा संघर्ष आगामी निवडणुकांतील गांभीर्य दाखवून देतो. या संघर्षाच्या एका बाजूस आहे ह्यचारसो पारह्लचा दावा करून स्वतःच स्वतःच्या पिंज्यात अडकलेला भाजप. या पक्षाचा महाराष्ट्रापुरता विचार केल्यास गेल्या निवडणुकांप्रमाणे राज्यातील ४८ जागांतील ४२ जागांची आशा बाळगणे त्या पक्षास दिवसेंदिवस अवघड वाटू लागले आहे. एके काळचा जोडीदार असलेल्या शिवसेनेस धडा शिकवण्याच्या ऊमीर्तून भाजपने शिवसेना फोडली खरी. पण त्यामुळे तयार झालेले विवर भरून काढण्यासाठी त्या पक्षास काय काय करावे लागत आहे हे पाहिल्यावर त्या पक्षाची आणि विवर भरून काढण्यासाठी त्यात उडी घेऊ इच्छिणाऱ्या पक्षांची अगतिकता लक्षात यावी. एकनाथ शिंदे आणि कंपूतील खुद्द शिंदे आणि एखाद-दुसरा सोडल्यास बाकीच्या राजकीय उडाणटप्पूंस स्वीकारण्यास भाजप तयार नाही. यातील बऱ्याच गणंगांविरोधात भाजपत मोठी अंतर्गत नाराजी असून त्याचा फटका भाजपच्या अंकगणितांस बसणार नाही; असे अजिबात नाही. उलट या सगळ्या गटातटांतील तणाव लक्षात घेता तो बसणार हे निश्चित. ठाकरे यांच्या गटातील १३ खासदार शिंदे यांच्यासमवेत आहेत. त्या सर्वांस उमेदवारी देणे म्हणजे भाजपने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेणे. तो पक्ष असे काही आततायी कृत्य करणे अशक्य. तितकी दुर्दैवी परिस्थिती भाजपवर आलेली नाही. पण या गणंगगंपूंस हाताळताना ती लवकरच येईल. खेरीज भाजपच्या गरज सरो, वैद्या मरो या वृत्तीमुळे उमेदवारी नाकारली गेलेले भिन्नपक्षीय अन्य उमेदवारांचे दिल से स्वागत करतील याची सुतराम शक्यता नाही. ते राणा दाम्पत्य काय किंवा काही राजघराण्यांचे वंशज काय! दिल्लीश्वरांच्या हट्टापायी काय काय पात्रांस जवळ करण्याची वेळ भाजपने स्वतःवर आणली हे पाहून त्या पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाची कीव यावी. आणि आता हे सर्व कमी पडतात म्हणून की काय राज ठाकरे यांच्या मनसेचे इंजिन भाजप मागच्या बाजूने आपल्या गाडीस जोडताना दिसतो. अन्य काही पक्षीय डब्यांप्रमाणे हे इंजिनही बराच काळ यार्डात होते. त्यामुळे त्यास गती देण्यात काही काळ जाईल. या मनसेच्या इंजिनास भाजपच्या गाडीस ढकलण्यात जितका रस आहे त्यापेक्षा अन्य गाड्यांची ह्यतुतारीह्ल बुजवण्याची आणि ह्यमशालह्ल विझवण्याची अधिक निकड आहे. अलीकडच्या काळातील स्थितीवादामुळे हे इंजिन स्वतःहून धावू शकत नाही, असे चित्र निर्माण झाले आहे. आताही ते किती ताकदीने धावेल हा प्रश्न आहेच. पण रेल्वे गाडी घाटातून जाताना मागे इंजिन असण्याची म्हणून एक उपयुक्तता असते. त्याचा विचार करून भाजपस हे मनसे इंजिन आपल्या गाडीस जोडून घेण्यात स्वारस्य असणार. राजकारणात असे प्रसंग येतात. पण त्यामुळे भाजपची घाट-कोंडी झाल्याचा संदेश राजकीय वातावरणात पसरत असून ठाकरे नावाच्या इंजिनाच्या मदतीशिवाय दुस्तर हा घाट ओलांडणे त्यास शक्य नाही, असे दिसते. दुसरीकडे काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवार यांस कोठे जायचे आहे हे ठाऊक आहे; पण मागार्बाबतचा त्यांच्यातील गोंधळ लपवणे अवघड होत असावे. मुंबईत ठाकरे यांच्या शिवसेनेस सहानुभूती आहे; पण तिचा सुयोग्य वापर करण्यासाठी उमेदवारांची वानवा! जे नेते अजून त्यांच्यासमवेत आहेत त्यांच्याबाबत आत्ता होते; गेले कुठे असा प्रश्न कधी विचारावा लागेल हे सांगता येत नाही अशी स्थिती. शरद पवारांच्या राष्ट्रवादीस सुप्रिया सुळे यांच्या बारामतीचा घोर लागलेला आणि उरलेला वेळ अजितदादांकडील नाराज गळास लावण्यात चाललेला.

काँग्रेसची अवस्था याहून बिकट. उरल्या-सुरल्या पांघरुणात पाय झाकावयास जावे तर डोके उघडे पडते आणि ते डोक्यावर ओढून घ्यावे तर पाय पांघरुणाबाहेर. असा हा पेच. या सगळ्याच्या जोडीला आपल्या भुणभुणीने सतत झोपमोड करणाऱ्यांसारखी वंचित आघाडी. वास्तविक प्रकाश आंबेडकर डावीकडे पाहत उजवा रस्ता कसे निवडतात हे जगास माहीत. आपण तन-मनाने भाजपविरोधात आहोत, असे ते दाखवतात. पण प्रश्न तन-मनाचा नसतो. त्यानंतरच्या ह्यधनह्लचा असतो हे समस्त राजकीय वतुर्ळातील उघड गुपित. तेव्हा त्यांना हाताळण्याचा अनुभव ह्यओलाह्ल, ह्यउबरह्ल टॅक्सी सेवेचे स्मरण करणारा ठरतो. या टॅक्सीचालकांस जेव्हा आपणासाठी यावयाचे नसते; तेव्हा ते येत नाहीतच पण तरी भाडे रद्द करण्याचे पाप आणि भुर्दंड मात्र ते आपल्या गळ्यात घालू पाहतात. त्याप्रमाणे प्रकाश आंबेडकर यांस भाजपविरोधात ह्यइंडियाह्ल आघाडीचा घटक होण्याची ह्यआतूनह्ल इच्छा नाही, पण आपण युतीस तयार नाही असेही त्यांस दाखवावयाचे नाही. हा दुसरा पेच. त्यातून विरोधक कसा मार्ग काढतात हे पाहणे महाराष्ट्राचे राजकीय उद्बोधन करणारे ठरेल, यात शंका नाही. हा या राज्यातील राजकारणाने गाठलेला नवा तळ. इतके दिवस काही एक राजकीय विचार, तात्त्विकादी मतभेद राजकीय फाटाफुटीमागील कारण ठरत. आता तो काळ इतिहासजमा झाला. आजचा काळ उद्याचे वा परवाचे राजकारण पाहण्याचा नाही. तर आजचे आणि त्यातही आताचे काय ते बोला, यावर आपले राजकारण येऊन ठेपलेले आहे. म्हणून आजच्या राजकारणास रेल्वे स्थानक आणि याडार्तील डब्यांची उपमा चपखल ठरावी. निवडणुकांच्या हंगामात या दोन्ही रेल्वे गाड्या आता धावू लागतील. तथापि या रेल्वे गाड्यांतील किती डब्यांत प्रवासी आहेत आणि किती डबे प्रत्यक्षात मालगाडीचे- त्यातही रिकामे- आहेत इतके कळणे फक्त आता बाकी.

# कल्याणमध्ये तीन लाख युवा मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## १९५५ मतदान केंद्र उपलब्ध ; ६० भरारी पथके तैनात

**कल्याण** : कल्याण लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी निवडणूक होणार असून त्याबाबतची पूर्वतयारी करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी १९५५ मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यात आली असून मतदारसंघांतील गैव्यवहारांवर वॉच ठेवण्यासाठी ६० भरारी पथके तैनात करण्यात आल्याची माहिती कल्याण लोकसभेच्या निवडणुक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली. यावर्षी कल्याण लोकसभा मतदारसंघात ३,११,६९४ युवा मतदार पहिल्यांदाच आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूका जाहीर केल्या असून १८ व्या लोकसभेसाठी राज्यात १८ एप्रिल ते १ जूनपर्यंत निवडणूका होणार आहेत. कल्याण लोकसभा मतदासंघांतील निवडणुक प्रक्रियेची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी डोंबिवलीत पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी विश्वास गुजर हे देखील उपस्थित होते. कल्याण लोकसभा मतदारसंघात मिळून अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण पुर्व - पश्चिम, डोंबिवली, कळवा - मुंब्रा अशा सहा विधानसभा मतदासंघाचा समावेश आहे. लोकसभेत एकूण २०,१८,९५८ मतदार असून यामध्ये १०, ८५,७१० पुरुष, ९ , ३२,५१० महिला, ७३८ तृतीयपंथी, १०, ८०२ दिव्यांग, १८, १७९ मतदार ८५ वर्षांवरील असून २२,१७९ नवमतदार आहेत. यावर्षी ३,११,६९४ युवा मतदार पहिल्यांदाच आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघात प्रत्येक उमेदवाराला ७५ लाख रुपये खर्च करण्याची मर्यादा घालून देण्यात आलेली आहे. ६० भरारी पथके, निवडणूक पथकेही नेमण्यात आलेली आहेत. ८५ वयोगटावरील



### ७५ टक्के मतदान होण्यासाठी प्रयत्न

- मागील २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत कल्याण लोकसभा मतदारसंघात ४५ टक्के इतके कमी मतदान झाले होते . त्यामुळे यंदा ७५ टक्के मतदान होणे आयोगाला अपेक्षित आहे . मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जास्तीत जास्त मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे .
- येत्या २३ एप्रिलपर्यंत १८ वर्षांवरील नागरिकांना मतदारयादीत नाव नोंदणी करता येणार आहे . तसेच १८ वर्षे पूर्ण होणार असलेल्या तरुणांना पण आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे . निवडणूक शांततेत पार पाडण्याबरोबरच मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडून मतदानासाठी यावे असे आवाहन निवडणूक निर्णय कार्यकारी अधिकारी सुषमा सातपुते यांनी यावेळी केले .



### असा आहे निवडणुक कार्यक्रम

- निवडणूकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दि. २६ एप्रिल (शुक्रवार)
- नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दि. ३ मे (शुक्रवार)
- नामनिर्देशन पत्रांची छाननी दि. ४ मे (शनिवार)
- उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दि. ६ मे (सोमवार)
- मतदानाचा दि. २० मे (सोमवार)
- मतमोजणीचा दि. ४ जून (मंगळवार)

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदार यांच्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सि-व्हीजील ॲपद्वारे निवडणुकीच्या दरम्यान काही अनियमितता आढळल्यास सि-व्हीजील या ॲपद्वारे संदेश शेअर करू शकतात.

# डोंबिवली मंगळसूत्र चोरी प्रकरणः इराणी टोळीतील १० आरोपींची 'मोक्का'मधून मुक्तता

**डोंबिवली** : डोंबिवलीतील एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी प्रकरणात रामनगर पोलिसांनी आंबिवलीच्या इराणी वस्तीमधील १० जणांना अटक करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याने (मोक्का) दहा वर्षापूर्वी कारवाई केली होती. रामनगर पोलिसांनी या चोरी प्रकरणातील तपासात अनेक त्रृटी ठेवल्या आहेत. आरोपींविरुद्ध सबळ पुरावे उपलब्ध नसताना त्यांना नियमबाह्य पद्धतीने या प्रकरणात गोवून त्यांच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केल्याचा ठपका ठेवत ठाणे येथील मोक्का न्यायालयाचे न्यायाधीश अमित शेट्ये यांनी मंगळसूत्र चोरीचा आरोप असलेल्या इराणी टोळीतील दहा आरोपींची मोक्का आरोपातून मुक्तता केली. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. संजय मोरे यांनी न्यायालयात बाजू मांडली. आरोपींतर्फे ॲड. पुनीत माहिमकर, ॲड. राजय गायकवाड, ॲड. जावेद शेख यांनी काम पाहिले. आरोपींच्या वकिलांनी पोलिसांनी प्राथमिक नोंदणी अहवालात दोन आरोपींचा उल्लेख करून उर्वरित आठ आरोपींचा उल्लेख नसताना त्यांना अटक करून त्यांच्या विरुद्ध सबळ पुरावे नसताना त्यांच्यावर मंगळसूत्र चोरल्याचा ठपका ठेवल्याचे कथानक रचले. या सर्व आरोपींना मोक्का कायद्याने कारवाई केली, अशी माहिती न्यायालयाला दिली. सरकार पक्षातर्फे त्याचा प्रतिवाद करण्यात आला. मोक्का न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून मंगळसूत्र चोरीचा आरोप ठेऊन त्यांना मोक्का लावलेल्या दहा आरोपींची मोक्का आरोपातून मुक्तता केली. सुटका झालेले दहा आरोपी आंबिवली येथील इराणी वस्तीमधील रहिवासी आहेत. ते कुख्यात इराणी टोळीचे सदस्य आहेत.

मुक्तता झालेल्यांमध्ये शेरबी युसुफ सय्यद (७७), फिजा रहिम शेख (४२), वासिम फिरोज इराणी (३७), शकील सय्यद ९४२), मेहंदी सय्यद (४०), साधू इराणी (३३), यावर सलीम हुसेन (३७), यावर काझम हुसेन (३७), तरबेज जाकर इराणी (४०), अख्तर इराणी (३७), नासिक हाफिज खान (४५) यांचा समावेश आहे. डोंबिवलीतील फडके रस्त्यावरील श्री गणेश मंदिर येथून फेब्रुवारी २०१५ मध्ये दीपा टिकेकर ही महिला संध्याकाळच्या वेळेत पायी चालल्या होत्या. त्यावेळी मोटार सायकलवरून आलेल्या दोन जणांनी दीपा यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळ काढला.

याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात दीपा यांनी तक्रार केली होती. दुचाकीचा वाहन क्रमांक पोलीस तक्रारीत नोंद नसताना पोलिसांनी कोणत्या तपासाच्या आधारे या आरोपींना अटक केली. दहा आरोपींविरुद्ध कोणते सबळ पुरावे तुमच्याकडे आहेत. तपासात अनेक त्रृटी असताना तुम्ही आरोपींना मोक्का कायदा लावला कसा, असे प्रश्न करत पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत न्यायालयाने दहा आरोपींची मोक्का आरोपीतून मुक्तता केली.

# 'Loved playing with the debutants': Rohit



**New Delhi** : Skipper Rohit Sharma on Wednesday said he revelled in the company of his young "mischievous" teammates and was overwhelmed by emotions as they made their debuts during India's monumental 4-1 Test series triumph over England.

The five-Test home series saw five youngsters—Rajat Patidar, Dhruv Jurel, Sarfaraz Khan, Akash Deep and Devdutt Padikkal—make their debut as India showed resilience to fight back after losing the opening Test in Hyderabad. "Personally, mujhe inke saath kaam karke bahut maza aaya. Jitne bhi young ladke the... sab kaafi chulbule the. [I really loved playing with them. All of them are very mischievous]," Rohit said on his Instagram handle Team Ro.

"I knew most of them well and what their strengths are and how they want to play the game. It was just for me to give them the comfort by talking about how good they are and the good things they have done in the past. The way they responded to me and Rahul bhai [coach Rahul Dravid] was superb," he added.

# 'CR spends way more than WR on escalator maintenance'

**Mumbai**

An RTI query by an activist has revealed that Central Railway (CR), despite spending more money on escalator maintenance compared to Western Railway (WR), does not maintain records of malfunctioning and stoppages. While WR's cost per escalator is Rs 1.85 lakh per annum for 106 escalators between Churchgate and Virar, CR's cost for maintenance of each of the 101 escalators between CSMT-Kalyan and Vashi is Rs 2.97 lakh. RTI activist Anil Galgali claimed that CR was incurring a loss of Rs 1.13 crore per annum due to the situation. "Asked about stopping and malfunctioning of escalators, WR had ready information and explained that 1,825 escalator closures occurred last year and that 95 per cent of emergency button pressing was done by unidentified miscreants causing the escalator to shut down. CR officials admitted that the information about the closure and malfunctioning of escalators was not available and that information only on escalators closure on special days could be provided on request," he said.



Galgali expressed surprise at the difference in cost of Rs 1.12 lakh regarding escalators under two railways in Mumbai. CR chief public relations officer Dr Swapnil Nila said, "The maintenance cost of escalators on CR includes the cost of accessories, which may not be the case with WR."

The RTI query states that one escalator is stopped on WR about 1,825 times in a year of which 95 per cent is due to pressing of emergency button by unidentified miscreants. At this rate, a total of 106 escalators are stopped 1.96 lakh times in a year.

## दारू बनवण्याच्या ठिकाणी छापा

■ **डोंबिवली** : येथे कोळेगाव परिसरात बनावट देशी दारू बनविण्यात येत होती.तेथे छापा टाकून मानपाडा पोलिसांनी ३५ लिटर दारूने भरलेला ड्रम नाल्यात ओतून टाकला व दारू बनवण्याचे साहित्य देखील नष्ट करण्याची कारवाई केली .याप्रकरणी दारू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या निलेश पाटील (२६) याच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे पोलिस आयुक्तांनी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शहरात अवैध दारू, ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत.

## हाणामारीत एकाची हत्या, तिघे जखमी

■ **कल्याण** : कल्याण पूर्वेत तरुणांच्या दोन गटांत किरकोळ वादातून झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू, तर तीन जण जखमी झाले आहेत. यश गुप्ता असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी काही तरुणांना ताब्यात घेतले आहे. चेतना ते आडिवली परिसरातील जय मल्हार हॉटेलसमोर सोमवारी मध्यरात्री काही तरुण उभे होते. प्रेम भोवाड नावाचा तरुण त्याचा मित्र यश गुप्ता आणि राहुल केणी यांच्यासोबत जनकल्याण रुग्णालयात जात होते. यावेळी उभे असलेल्या तरुणांनी या तिघांना थांबण्यास सांगितले. मात्र तिघेही न थांबता रुग्णालयात गेले. रुग्णालयातून पुन्हा त्याच रस्त्याने येत असताना बांधकाम व्यावसायिक असलेला योगेश पटेल याने मित्र राहुल पाठक, संतोष यादव यांसह प्रेम आणि यश या दोघांना मारहाण करण्यास सुरुवात केली. यश गुप्ता हा त्यांच्या तावडीतून सुटून घरी पळाला. मात्र योगेश पटेलने साथीदारांना घेऊन यशचे घर गाठले.

## आचारसंहिता संपेपर्यंत लोकशाही दिन नाही

■ **कल्याण** : सर्वसामान्य जनतेच्या अडचणी, तक्रारींचे शासकीय यंत्रणेकडून तत्परतेने निवारण करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून शासन परिपत्रकानुसार जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालयस्तरावर लोकशाही दिन राबविण्यात येत असतो. कल्याण - डोंबिवली महापालिकेतही दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मात्र लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहिर केला असून दि. १६ मार्चपासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता संपुष्टात येईपर्यंत कल्याण - डोंबिवली महापालिकेत यापुढील लोकशाही दिन होणार नसल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

## पलावा सिटीत करभरणा केंद्र

■ **कल्याण**: कल्याण - डोंबिवली महापालिकेने दि. ३ ते ३१ मार्च या कालावधीत अभय योजना लागू केली आहे. या पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सोयीसाठी पालिकेच्या विविध प्रभाग क्षेत्रात अतिरिक्त कर भरणा केंद्रे सुरू केली आहेत. कल्याण - शिळ मार्गावरील पलावा सिटी या मोठया गृहसंकुलातील नागरिकांच्या सोयीसाठी देखील गुरूवार पलावा सिटीमधील पलावा कासारियो मेन क्लब हाउस येथे कर भरणा केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पलावा सिटीतील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

# खंडणीच्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवत १.८२ कोटी उकळले

■ **मुंबई** : भागीदारीतील व्यवसायात गुंतवलेल्या रकमेची वसुली करून देण्याच्या आमिषाने जाळ्यात ओढत खंडणीच्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवत व्यावसायिकाकडून १ कोटी ८२ लाख रुपये उकळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सर जे. जे. मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हे शाखेच्या कक्ष ३ ने दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. ग्रँटरोड परिसरातील ३६ वर्षीय व्यावसायिकाने पोलिसांत दिलेल्या




फिर्यादीनुसार, त्यांनी भागीदारीमध्ये एक व्यवसाय सुरू करून २०१५ ते २०१८ या काळात १ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. व्यवसायात तोटा झाल्याने तक्रारदार यांनी अन्य दोन भागीदार व्यावसायिकांना पैसे परत देण्यास सांगितले. मात्र, दोघेही त्यांना दाद देत नव्हते. याच, दरम्यान २०१९ मध्ये तक्रारदार यांची फुरकान अब्दुल अजीज मुजावर (४४) आणि नाजीम नब्बन शेख (४६) यांच्याशी ओळख झाली. या दोघांनी तक्रारदार यांना त्यांच्या भागीदार व्यावसायिकांकडून पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवले. रक्कम परत मिळेल या हेतूने तक्रारदार यांनी त्यांना होकार दिला. त्यानंतर मुजावर आणि शेख यांनी वेगवेगळी कारणे देत तक्रारदार यांनाच पोलिसांकडून खंडणीचा गुन्हा दाखल होण्याची भीती घालत पैसे उकळण्यास सुरुवात केली. दोन्ही आरोपींनी तक्रारदार यांच्याकडून १ कोटी २८ लाख ६३ हजार ८०० रुपये रोखीने आणि ५३ लाख ८७ हजार २०० रुपये बँक व्यवहारातून असे एकूण १ कोटी ८२ लाख ५१ हजार रुपये उकळले. मुजावर आणि शेख यांच्याकडून वारंवार धमकावले जात असल्याने आणि पैशांची मागणी वाढल्याने अखेर तक्रारदार यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार, सर जे. जे. मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हा गुन्हा पुढील तपासासाठी गुन्हे शाखेच्या कक्ष ३ कडे वर्ग करण्यात आला असून, प्रभारी पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या पथकाने दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

# राहुल पाटील याला न्यायालयीन कोठडी

■ **नवीन पनवेल** : मथूर बैलाचे मालक राहुल पाटील याला काही दिवसांपूर्वी पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. त्यानंतर आशिष चौहान, मुकेश चित्ते, दिनेश यादव या तिघांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना २० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. त्याची पोलीस कोठडी संपल्यानंतर पुन्हा पनवेल येथील न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. या गुन्ह्यातील आणखी आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेले पिस्तूल जप्त केले आहे.



१२ मार्च रोजी ओवळे येथील शर्यतीत अश्लील हावभाव, दगडफेक आणि एका व्यक्तीने केलेल्या गोळीबाराप्रकरणी राहुल पाटीलसह काही जणांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी राहुल पाटीलला अटक केली. दोन दिवसांनी आशिष चौहान, मुकेश चित्ते, दिनेश यादव या तिघांना अटक करण्यात आली. न्यायालयाने यांना २० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. त्याची पोलीस कोठडी बुधवारी संपल्यानंतर राहुल पाटीलसह चौघांना पुन्हा पनवेल येथील न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.पनवेल शहर पोलिसांकडून अटक करण्यात आलेल्या मुकेश चित्ते यांच्याकडून भापगाव-कल्याण येथून पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. आरोपीने पिस्तूल कुठून प्राप्त केले आणि कशासाठी आणले होते याचा तपास पोलीस करत आहेत.

# डॉक्टर महिलेची अटल सेतूवरून उडी टाकून आत्महत्या

### नैराश्यातून आत्महत्या केल्याचे उघड

■ **नवी मुंबई** : दादर येथील भोईवाडा परिसरात राहणाऱ्या एका ४३ वर्षीय महिला डॉक्टरने सोमवारी दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास शिवडी न्हावा शेवा सी लिंकवरून समुद्रात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. किंजल कांतीलाल शहा (४३) असे या महिला डॉक्टरचे नाव असून नैराश्यातून तिने आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. किंजल शहा हिचा मृतदेह पोलिसांच्या हाती लागलेला नसून पोलिसांकडून अद्याप शोध मोहीम सुरू आहे.

या घटनेतील मृत महिला डॉक्टर किंजल शहा ही दादर भोईवाडा येथे आईवडिलांसह राहत होती. एमबीबीएस डॉक्टर असलेली किंजल शहा ही मागील दहा वर्षांपासून डिप्रेशनमध्ये होती. त्यामुळे तिने गेल्या दहा वर्षांपासून डॉक्टरी पेशा सोडला होता. या नैराश्येतूनच किंजलने गत सोमवारी सकाळी आपल्या घराजवळून टॅक्सी पकडून थेट शिवडी-नाव्हा शेवा लिंक अटल सेतू गाठला. त्यानंतर तिने थेट समुद्रात उडी टाकून आत्महत्या केली. टॅक्सी चालकाने याबाबतची माहिती नवी मुंबई पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी अटल सेतूवर धाव घेऊन समुद्रात उडी टाकलेल्या किंजलची शोधाशोध सुरू केली. दरम्यान, किंजल दुपारी घरी न पोहोचल्याने तिच्या वडिलांनी भोईवाडा पोलीस ठाणे गाठून ती हरवल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर किंजलने घरातून बाहेर पडण्यापूर्वी घरामध्ये लिहून ठेवलेली चिठ्ठी तिच्या कुटुंबीयांच्या हाती लागली.

किंजलने आत्महत्या करण्यासाठी अटल सेतूवर जात असल्याचे या चिठ्ठीत लिहिल्याचे आढळून आले. तसेच ज्या टॅक्सीतून प्रवास करून ती अटल सेतूवर गेली, त्या टॅक्सी ड्रायव्हरला त्रास देऊ नये, असेही तिने चिठ्ठीत नमूद केले होते. त्यानंतर भोईवाडा पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर किंजल दादरच्या शिंदेवाडी येथून दुपारी १.४५ वाजता टॅक्सीत बसल्याचे आढळून आले. त्यानंतर भोईवाडा पोलिसांनी न्हावा शेवा पोलिसांशी संपर्क साधला.

मात्र त्यापूर्वीच न्हावा शेवा पोलीस अटल सेतू पुलावरून उडी मारलेल्या अनोळखी महिलेचा शोध घेत होते. सागरी सुरक्षा पोलीस, न्हावा शेवा पोलीस, भोईवाडा पोलिसांकडून किंजल शहाचा शोध घेण्यात आला. मात्र तिचा मृतदेह पोलिसांच्या हाती लागलेला नाही. अटल सेतू पुलावर बॅरिकेडिंगचे काम सुरू असलेल्या मोकळ्या जागेवरून किंजलने समुद्रात उडी टाकून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. न्हावा शेवा पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील शोध कार्य सुरू ठेवले आहे.

दरम्यान, आम्ही आमच्या बाजूने शोधकार्य सुरू ठेवले आहे, तर मुंबई पोलिसांनी त्यांच्या बाजूने शोधकार्य सुरू ठेवले आहे. या शोध कार्यासाठी वाशी, उरण आणि एनआरआय कोस्टल पोलिसांनादेखील सतर्क करण्यात आल्याची माहिती न्हावा शेवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी दिली.

### सेल्फी घेण्याच्या नादात महिला पडली समुद्रात

गत शनिवारी अंधेरी येथून अटल सेतू मार्गे पुण्याला जात असलेल्या कुटुंबातील महिलेला सेल्फीचा मोह आवरता आला नाही. त्यामुळे ही महिला अटल सेतू पुलावर उतरली होती. मात्र यावेळी सेल्फी घेण्याच्या प्रयत्नात ही महिला चुकून समुद्रात पडली होती. सुदैवाने त्याच ठिकाणी पुलाच्या खाली काम करण्यासाठी एक बोट उभी असल्याने त्या बोटीतील कामगारांनी यामहिलेला वेळीच बाहेर काढल्याने ती बचावली. न्हावा शेवा पोलिसांनी या महिलेचा जबाब नोंदवल्यानंतर ते कुटुंब पुण्याच्या दिशेने निघून गेले.

# खात्यावर पैसे जमा झाल्याचे मेसेज पाठवून सीएला ऑनलाइन गंडा

■ **मुंबई** : मित्र बोलत असल्याची बतावणी करून सायबर ठगाने एका सीएला खात्यावर एक लाख ४५ हजार रुपये पाठवल्याचे भासवत एक लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार गावदेवीमध्ये समोर आला. या प्रकरणी अज्ञात मोबाईलधारक आणि बँक खातेधारकाविरोधात गुन्हा दाखल करून गावदेवी पोलीस अधिक तपास करत आहेत.

ताडदेव रोड परिसरात राहात असलेले ४७ वर्षीय तक्रारदार हे सीए आहेत. १८ मार्चला त्यांना अनोळखी मोबाईल नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने मै दुर्गेश बात कर रहा हू ये मेरा नया नंबर है, असे सांगत त्यांच्याशी गप्पा मारण्यास सुरुवात केली. आपल्या ओळखीचे असलेले दुर्गेश आपल्याशी बोलत असल्याचा तक्रारदार यांचा समज झाला.

काही वेळ गप्पा मारल्यानंतर त्या कथित दुर्गेशने तक्रारदार यांना त्यांच्या एका मित्राचा अपघात झाला असून, त्याचे नातेवाईक तुझ्या खात्यावर पैसे पाठवतील. ते पैसे तू मी देत असलेल्या एका नंबरवर पाठव, असे सांगून त्याने एक मोबाईल नंबर पाठवला. तक्रारदार यांनी त्याला हो असे सांगताच त्यांच्या बँक खात्यात एकूण १ लाख ४५ हजार रुपये जमा झाल्याचे मेसेज त्यांच्या मोबाईलवर आले.

बँक खात्यात रक्कम जमा झाल्याच्या आलेल्या मेसेजची खातरजमा न करताच तक्रारदार यांनी आपल्या गुगल पे ॲपवरून एकूण एक लाख रुपये पाठवले. त्यानंतर तक्रारदार यांच्या गुगल पे ॲपचे लिमिट संपल्याने पुढील व्यवहार झाला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांच्याकडे असलेल्या दुर्गेश यांच्या मोबाईलवर क्रमांकावर पैशांचा पुढील व्यवहार न झाल्याचे स्क्रिनशॉट पाठवले. मोबाईलवर आलेले स्क्रिनशॉट बघून दुर्गेश याने तक्रारदार यांना फोन करून नेमके कसले स्क्रिनशॉट पाठवले, अशी विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी घडलेला प्रकार दुर्गेशला त्यांनी आपले बँक खाते तपासले. खात्यात १ लाख ४५ हजार रुपये जमा न होता, फक्त मेसेज पाठवण्यात आल्याचे त्यांना दिसले. अखेर आपली आर्थिक फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने त्यांनी गावदेवी पोलीस ठाणे गाठून तक्रार

# गर्भपातासाठी सासूने मारल्या सुनेच्या पोटावर लाथा

### सासू, दिरासह सात जणांवर गुन्हा दाखल

■ **कल्याण** : दररोज सांगूनही सून गर्भपात करून घेत नसल्याने संतप्त झालेल्या सासूने, जावेने आपल्या पोटावर लाथा मारल्याची तक्रार कल्याण पूर्वेतील एका गर्भवती महिलेने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात केली आहे. तीसगाव येथील साई दर्शन सोसायटीतील कुटुंबात हा धक्कादायक प्रकार घडला. याप्रकरणी सासू, दीर, जावेसह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




रेखा भगवान लोकरे (३३) असे तक्रारदार सुनेचे नाव असून त्या नोकरी करतात. गर्भवती असल्याने त्या कल्याणमध्ये आईकडे राहतात. त्यांनी गर्भपात करावा म्हणून नवी मुंबईत राहणारी सासू, दीर, जाव ही मंडळी आग्रही आहेत. मात्र रेखा त्यांचे म्हणणे ऐकत नसल्याने त्याचा जाब विचारण्यासाठी सोमवारी रात्री जावीर कुटुंब नवी मुंबईतून कल्याणमध्ये आले होते. यावेळी दुचाकीवरून जात असताना दीर रोहितने रेखाला खेचून पकडून ठेवले. तर जाव दीपाली, सासू सविता यांनी तिचे केस पकडून आम्ही सतत सांगूनही तू गर्भपात का करून घेत नाहीस, असे बोलत रेखाच्या पोटावर लाथा मारल्या. दोघींनी तिला नखांनी बोचकारून जखमी केले. त्यांच्या तावडीतून सुटका करून रेखा घरात बचावासाठी पळून गेल्या. मात्र सर्वांनी घरात घुसून पुन्हा रेखासह तिच्या आईलाही शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. रेखाच्या तक्रारीवरून पोलिसांनी नवी मुंबईतील कामोठे येथे राहणाऱ्या सासू सविता रघुनाथ जावीर (४७), दीर सुरज रघुनाथ जावीर (२८), रोहित (२७), जाव दीपाली सुरज जावीर (२४), प्रकाश काशिनाथ गोरवे (४३, रा. कळंबोली), रोहित यांचा एक मित्र आणि एक अनोळखी महिला यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, सुरज, दीपाली, प्रकाश यांना चौकशीस ताब्यात घेतले आहे. पोलीस उपनिरीक्षक यू. व्ही. जाधव अधिक तपास करत आहेत.

# भिवंडीतील भंगार गोदामाला लागली भीषण आग




■ **भिवंडी**: भिवंडी तालुक्यातील दापोडा परिसरातील वळ ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यालगत असलेल्या एका भंगार गोदामास मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागली.ही आग एवढी भयानक होती की पाहता पाहता तिने रौद्र रूप धारण केले.या आगीत लगत असलेली एकूण चार भंगार दुकाने जळून खाक झाली तसेचआगीच्या भक्षस्थानी या दुकानांसह जवळ असलेले एक चहाचे दुकान व दोन पान टपरी जळून खाक झाले. या आगीची झळ रस्त्यावर उभ्या करून ठेवलेल्या वाहनां पर्यंत पोहचल्याने या आगीत एक कंटेनर,एक छोटा बोलेरो टेम्पो व दोन दुचाकी जळून खाक झाल्या आहेत.आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजले नसून या आगीत लाखोंची मालमत्ता जळून खाक झाली आहे. भिवंडी तालुक्यात मोठया प्रमाणात ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक करणारी गोदामे व भंगारची दुकान आहेत. या ठिकाणी आग प्रतिबंध करणारे कोणत्याही उपाययोजना नसल्यामुळे वारंवार आगी लागण्याचे प्रकार घडत असतात.मध्यरात्री एक वाजल्याच्या सुमारास वळगाव परिसरात असलेल्या एका भंगार गोदामास आग लागली.नागरिकांना या आगीची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला.येथे आग विझवण्याची कोणत्याही प्रकारची यंत्रणा नसल्यामुळे या आगीने मोठया प्रमाणात रौद्र रूप धारण केले. संदर्भात स्थानिक नागरिकांनी पोलीस व अग्निशमन दलाला माहिती देताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र आगीच्या ज्वालांनी लगत असलेली गोदाम व दुकाने,पान टपरी, वाहने खाक झाली.

■ अग्निशमन दलाच्या जवानांनी ५ तास परिश्रम घेऊन आगीवर नियंत्रण मिळवत आग विझवली .या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही . मात्र लाखो रुपयांची मालमत्ता जळून खाक झाली आहे .आग भीषण असल्याने पोलिसांनी सुरक्षेच्या भूमिकेतून या रस्त्यावरील वाहतूक पहाटे पर्यंत रोखून ठेवली होती .त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली होती .नारपोली पोलिसांनी आगीची नोंद घेऊन चौकशी सुरू केली आहे .

# दुचाकी चोरणाऱ्या तिन आरोपींना अटक

### वालीव पोलिसांकडून सुमारे ३.५ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा गुन्ह्यांची उकल

■ **नालासोपारा** : दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींना वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून सहा गुन्ह्यांची उकल करून चोरीची १ रिक्षा, ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाईकपाडा येथील शिवभीमनगर येथील अन्वर कुरुश (२१) या तरुणाची दुचाकी चोरीस गेली होती. त्याने ९ मार्चला रात्री मेजरवाडी येथील सलामत चिकन शॉपसमोर दुचाकी पार्किंग केली असता चोरट्याने चोरली. याप्रकरणी वालीव पोलिसांनी वाहनचोरीचा



गुन्हा दाखल केला होता. वसई विरार परिसरात मोटार वाहनचोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्तांनी वाहनचोरीचे गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले. सातीवलीतून जेरबंद वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोधमोहीम राबवून सातीवली परिसरातून आरोपित रोहित राजेश सिंग, अनिल कपूर सिंग व मोहन हरजित सिंग यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडे चौकशी करून वसई, विरार आणि नालासोपारा परिसरातून चोरी केलेल्या १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच वालीव येथील ४, तुळींज येथील १ आणि पेल्हार येथील १ अशा ६ गुन्ह्यांची उकल केली आहे.

# २८ मार्च पर्यंत बिल भरा, अन्यथा पाणी पुरवठा खंडित

### जल विभागाचा नागरिकांना इशारा

■ **मुंब्रा**: पाणी बिलाची शंभर टक्के वसूली जलविभागाला अद्याप करता आलेली नाही. त्यामुळे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी जास्तीत जास्त थकबाकी वसूल करण्यासाठी जलविभागाने कडक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. बिले न भरणाऱ्यांना २८ मार्चपर्यंत नोटीस देण्यात येत आहे. या कालावधीत पैसे न भरल्यास पाणी पुरवठा खंडित करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यासाठी विभागाच्या वतीने मोहीम राबवून थकबाकी वसूल करण्यात येत असल्याचे जल विभागाचे कार्यकारी अभियंता शशिकांत साळुंखे यांनी सांगितले.

विलंब शुल्क माफ करून पाणी विभाग गेल्या दीड महिन्यांपासून ग्राहकांना बिले भरण्यासाठी प्रवृत्त करत आहे. त्यामुळे बिल भरण्याचा वेग वाढला आहे. मात्र तरीही विविध झोनमध्ये लाखो रुपयांची थकबाकी आहे.ग्राहकांच्या सोयीसाठी अभय योजना राबविण्यात येत असून, आतापर्यंत एकूण २० कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी केवळ १० कोटी रुपयांचीच वसूली झाली आहे.गेल्या आठवड्यात झालेल्या पाणीपुरवठा विभागाच्या बैठकीत सुचना देण्यात आल्या होत्या. थकबाकी न भरणाऱ्यांची जोडणी तोडण्यात येणार आहे. पाणी बिले तोडली जावीत, यासाठी ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाणी बिल थकबाकीदारांवर कारवाई सुरू केली आहे.मार्च महिन्याच्या शेवटच्या १० दिवसांत मोहीम राबवून वसुलीला गती देण्याची तयारी सुरू असून, त्याअंतर्गत ग्राहकांना ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे.मुंब्रा कौसा मध्येही चार ही परिमंडळातील कार्यकारी अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली थकबाकीची बिले वसूल केली जात आहेत. नागरिकांनी ही बिले त्वरित भरावीत अन्यथा त्यांचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला आहे.



# वसई-विरार पालिकेने शुभेच्छांचे बॅनर उतरवले

■ **नालासोपारा** : निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने वसई-विरार शहर महापालिकेने अनधिकृत बॅनर, पोस्टरवर कारवाई करत राजकीय पक्षाचे झेंडे काढण्यात आले आहे. शहरातील ३,५८९ नेत्यांच्या वाढदिवसाचे शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज, कार्यक्रमांचे बॅनर लोकसभेची आचारसंहिता लागताच खाली उतरवले आहेत. शहर विद्रुपीकरणाला कारणीभूत झालेले ३०८४ बॅनर, पोस्टर्स मागील तीन दिवसांत उतरवलेले आहे. लोकसभा निवडणूकनिमित्त शहराने मोकळा श्वास घेतल्याचे दिसत आहे. आचारसंहितेपूर्वी शहरातील विविध भागांत राजकीय बॅनर मोठ्या प्रमाणात झळकले होते. शासन आपल्या दारी, नमो महारोजगार मेळावा, विविध स्वरूपाची भूमिपूजने, लोकार्पणासाठी लावलेल्या बॅनरमुळे शहर विद्रूप झाले होते. पालिकेच्या माध्यमातून या बेकायदा बॅनर, पोस्टरवर कोणत्याही स्वरूपाची कारवाई केली जात नव्हती. मुख्य रस्त्यांवरील विद्युत खांबांवरही फलक, झेंडे लावले जातात. अशा प्रकारचे बॅनर, झेंडे लावण्यात राजकीय पक्षांचे पदाधिकारी आघाडीवर असल्याचे दिसून येतात. अशा प्रकारांना आळा बसावा, यासाठी पालिकेने शहरातील काही ठिकाणे निश्चित करून तेथे बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्याची योजना सुरू केली होती. यानंतर बेकायदा बॅनर, पोस्टर लावण्याचे प्रकार सुरूच होते. कारवाईत १६ ते १८ मार्चदरम्यान ४९५ झेंडे, १,२५३ पोस्टर आणि १,८३१ बॅनर असे एकूण ३,५८९ राजकीय पक्षाचे बॅनर, पोस्टर, झेंडे हटवल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

# लोकलवर दगडफेक, अज्ञात इसमांचा शोध सुरू

■ **कल्याण**: छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडून कसाऱ्याकडे धावणाऱ्या लोकलवर अज्ञात इसमाकडून करण्यात आलेल्या दगडफेकीत दोन प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची घटना टिटवाळा खडवली दरम्यान घडली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला. झोपडपट्टी परिसरातून ही दगडफेक झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुंबईकडून कसाऱ्याकडे जाणाऱ्या प्रवाशांनी खचाखच भरलेल्या लोकलवर खडवली स्थानक येण्यापूर्वी दगडफेक झाल्याची घटना बुधवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली. बाहेरून फेकले गेलेले दगड दरवाजात उभे राहून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांना लागल्याने ते किरकोळ जखमी झाले. या घटनेची प्रवाशांनी रेल्वे पोलिसांना माहिती दिली.

मात्र जखमींनी तक्रार देण्यास नकार दिल्याने याप्रकरणी गुन्हा दाखल होऊ शकला नसला तरीही यासारख्या उपद्रवींचा उपद्रव रोखण्यासाठी रेल्वेकडून या अज्ञाताचा शोध सुरू असल्याचे कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशनचे सीनियर पोलीस इन्स्पेक्टर पंढरीनाथ कांदे यांनी सांगितले. दरम्यान खडवली रेल्वे स्थानकाआधी रेल्वे लाइन लगत असलेल्या झोपडपट्टीतून ही दगडफेक झाल्याची शक्यता व्यक्त केल्याच्या दृष्टिकोनातून तपास सुरू असल्याचे कल्याण लोहमार्ग पोलिसांनी संपर्क साधला असता सांगितले.